# वाशिम जिल्हा पोलीस दल

www.washimpolice.org

पोलीस भरती-२०११

**प्रेस नोट**

दि :- ०९/१२/२०११

दि. ०९.१२.२०११ रोजी दै.देशान्नती मध्ये छापील पोलीस भरती प्रक्रीया नियम बाहय बाबत पोलीस प्रशासनाचा खुलासा.

मुद्या /बाब क्र.१

लेखी परिक्षेकरीता नियमबाहय जास्त उमेदवारांचा समावेश

खुलासा :-

लेखी परिक्षेकरीता मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.प्रशि/पोशि-भरती/मार्गदर्शक तत्वे/पोभ-२०११/३८४१ दि. २६.८.२०११ चे मार्गदर्शक तत्वानुसार १:१५ प्रमाणकानुसार निवड यादी तयार केलेली आहे. त्यामध्ये या निवड यादीवर शेवटच्या उमेदवारास जेवढे गुण मिळाले आहेत. त्या समान गुण मिळवणा-या सर्व उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेतली गेली आहे.
उदा :- खुल्या गटामध्ये अखेरचा मैदानी परिक्षेतील उमेदवारास ८२ गुण आहेत. तर ८२ गुण असलेले एकुण २८५ इतके उमेदवार या सर्वांना लेखी परिक्षेस पात्र केले आहे.

बाब क्र. २ :- लेखी परिक्षेत तीन प्रश्न चुकीचे असतांना १०० पैकी ९८ गुण पात्रता यादीत

खुलासा :- लेखी परिक्षा १०० गुणांची व एकुण १०० प्रश्नांची झाली असुन त्यामध्ये कोणताही प्रश्न चुकीचा नाही. ज्या उमेदवारांना प्रश्नांबाबत शंका होती अशा सर्व उमेदवारांचे शंका निरसन, शंका निरसन केंद्राकडुन करण्यात आले आहे.

बाब क्र.३ :- प्रश्नपत्रिकेत अ,ब,क,ड संचाचा समावेश नाही.
खुलासा :- मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.प्रशि/पोशि-भरती/मार्गदर्शक तत्वे/पोभ-२०११/३८४१ दि. २६.८.२०११ चे मार्गदर्शक तत्वामध्ये लेखी परिक्षा ही मराठी भाषेत घेण्यात येईल, सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाचे राहतील असे नमुद आहे त्यामध्ये लेखी परिक्षा ही A,B,C,D पॅटर्न प्रश्नपत्रिका द्यावी किंवा इतर कोणत्या पध्दतीने द्यावी या बाबत काही एक नमुद नाही. त्यामुळे सदरची लेखी परिक्षा बहुपर्यायी स्वरुपाचे प्रश्न तयार करुन घेण्यात आलेली आहे व ती नियमानुसारच घेतलेली आहे.
बाब क्र.४ :- एन टी- क मध्ये उमेदवार गणेश हाके रा. वारला याला१७० गुण असतांना १६८ गुण असलेला उमेदवार पात्र.
खुलासा :- सदर उमेदवार यांचा आक्षेप अर्ज घेण्यात आलेला असुन सदरचा अर्ज निवड मंडळासमोर समक्ष माडण्यात आलेला असुन तो विचाराधीन आहे, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
बाब क्र.५ :- महिला उमेदवार सागर गवई यांना १२० गुण असुन जेष्टतेनुसार पात्र असतांना दुस-या १२० गुण असलेल्या महिला उमेदवारास पात्र ठरविले .

खुलासा :- शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ/मंत्रालय मुंबई दि. २७.६.२००८ चे परिपत्रकामध्ये मुद्या क्र. ६ मध्ये उमेदवाराना समान गुण मिळाल्यास परिक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल. असे नमुद आहे.

१) अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास उच्च शैक्षणिक अहर्ता धारण करणारे उमेदवार : त्यानंतर

२) मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत प्रथम अनुसुचित जमाती मधील नंतर अनुसुचित जाती, विशेष मागासप्रवर्ग, विमुक्त जाती ( १४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९० पुर्वीच्या २८ व तत्सम जमाती) भटक्या जमाती ( धनगर व तत्सम) इतर मागासवर्ग या क्रमाने : त्यानंतर

३) शारिरीक दृष्टया अपंग असलेले उमेदवार : त्यानंतर

४) माजी सैनिक असलेले उमेदवार : त्यानंतर

५) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार : त्यानंतर

६) वय ( वयाने जेष्ट असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल )

वरिल प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

समान गुण मिळालेल्या उमेदवारांचे बाबतीत उपरोक्त शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

वाशिम जिल्हा पोलीस भरती-२०११ ही अत्यंत पारदर्शकपणे व नियमांचे काटेकोरपणे पालन करुन करण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणत्याही अपात्र झालेल्या उमेदवारानी आपली गैरसमजुत करुन घेऊ नये असे आवाहन पोलीस अधीक्षक वाशिम यांनी केले आहे.

( एम.बी.तांबडे )

पोलीस अधीक्षक वाशिम